**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात कोरोना वॉरियर्स गीत लोकार्पण सोहळा संपन्न**
**कुलगुरूंनी केले लोकार्पण**
**चित्रपट अभिनेते भारत गणेशपूरे यांचा सहभाग**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने 'कल फिर निकलेगा सुरज, कल फिर चमकेगा तारा' प्रण प्रस्तुत कोरोना वॉरियर्स गीताचा लोकार्पण सोहळा ऑनलाईन पद्धतीने साजरा झाला. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी गीताचे लोकार्पण केले. या सोहळ्याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, चित्रपट अभिनेते भारत गणेशपूरे, बिग बॉस मराठी विजेते शिव ठाकरे, ईटीव्ही गौरव महाराष्ट्राचा फेम कु. धनश्री देशपांडे, गीत संकल्पना देणारे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, संगीत दिग्दर्शक डॉ. निखीलेश नलोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

अभिनेते भारत गणेशपूरे गीताचे लोकार्पण झाल्यावर म्हणाले, कोरोनावर विद्यापीठाने तयार केलेले प्रोत्साहनपर गीत खूपच सुंदर झाले आहे. अमरावतीत कोरोनाचे प्रमाण वाढत आहे, पण मोठ्या संख्येने लोक बरे सुद्धा होत आहे. कोरोनावर तयार झालेले गीत जास्तीतजास्त लोकांनी ऐकावे आणि आपले मनोबल वाढवावे, असे ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटनपर भाषण करतांना म्हणाले, विद्यापीठाने कोरोना काळात समाजोपयोगी व शैक्षणिक अनेक महत्वाच्या व उपयुक्त गोष्टी केल्या आहेत. सामाजिक जीवनात संकटे येत असतात; पण संकटांना बाजुला सारुन स्वतःला, आपल्या जीवनाला प्रेरणा देण्याचे कार्य होणे आवश्यक आहे. या गीताने निश्चितच सर्वांना एक नवी प्रेरणा मिळेल. गीत तयार करण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेतल्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक करुन या गीतामुळे नक्कीच प्रत्येकाच्या जीवनात आनंदाचा क्षण येईल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी कु. धनश्री देशपांडे, शिव ठाकरे, डॉ. निखीलेश नलोडे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. व्य.प. सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांनी विशेष पुढाकार घेवून गीताची संकल्पना सादर केली. संगीत दिग्दर्शन श्रीमती नानीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ येथील डॉ. निखीलेश नलोडे, संगीत संयोजक रवि गिरी, प्रशांत ठाकरे, मुकूंद सुर्यवंशी, तबला शितल मांडवगडे, ध्वनी शुभम वासेवाल, छायाचित्रण अमोल अढाव, पार्श्वगायन रविंद्र सावणी, धनश्री देशपांडे, मुकूंद सुर्यवंशी, कु. प्रणिती वाकोडे, अंजली ठाकरे, वैष्णवी ठाकूर, वैष्णवी भालेराव, प्रा. रवि गिरी, डॉ. निखीलेश नलोडे यांनी केले असून या गीताचे गीतकार श्री सचिन गोटे आहेत. याशिवाय आकाश सैतवाल, रोहन खंडारे यांनी बासरी वादन केले. या गीताचे रेकॉर्डींग कलाप्रस्त स्टुडीओमध्ये करण्यात आले. लोकार्पणप्रसंगी व्य.प. सदस्य डॉ. प्रदीप खेडकर, डॉ. अरुणा पाटील तसेच डॉ. भोजराज चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी हे गीत ऐकावे, अशा भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०७/०७/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी